# बहुजन विकास आघाडी

## परंपरा लोकशाहीची, सर्वांगीण विकासाची



**आपली निशाणी शिट्टी**

**आ. क्षितिज हितेंद्र ठाकूर**
१३२ - नालासोपारा

**आ. हितेंद्र विष्णू ठाकूर**
१३३ - वसई

**आ. राजेश रघुनाथ पाटील**
१३१ - बोईसर

**बहुजन विकास आघाडीचे उमेदवार, महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४**

# परंपरा लोकशाहीची - सर्वांगीण विकासाची

**प्रिय मतदार बंधू-भगिनींनो,**
**सप्रेम नमस्कार,**

माझ्यावर असलेले प्रेम आणि विश्वास यामुळे आपण मला सहा वेळा विधानसभेवर पाठवले. बळीराम जाधव यांना लोकसभेवर, तर क्षितिज ठाकूर, राजेश पाटील यांना देखील विधानसभेवर पाठवलं. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रत्येक निवडणुकीमध्येही **बहुजन विकास आघाडी**च्या माझ्या सर्व सहकाऱ्यांना आपण निवडून दिलेत. त्याबद्दल मी आपला ऋणी आहे. लोकप्रतिनिधी म्हणून मतदारसंघातील सर्व महत्त्वाच्या समस्यांची सोडवणूक करण्याचा धर्म **बहुजन विकास आघाडीने** आत्तापर्यंत प्रामाणिकपणे पाळला आहे.

**बुधवार, दिनांक २० नोव्हेंबर २०२४ रोजी महाराष्ट्रात विधानसभा निवडणुका होत आहेत.** आजचे राजकीय व सामाजिक वातावरण पाहाता या निवडणुकीला एक आगळेवेगळे महत्त्व प्राप्त झाले आहे. देशाच्या, राज्याच्या विकासापेक्षा धर्म-पंथ-जात यांच्या आधारावर निवडणुका लढवल्या जात असल्याचे चित्र आजतरी सकृतदर्शनी दिसते आहे. ही गोष्ट लोकशाहीच्या दृष्टीने अतिशय घातक आहे. त्यामुळे धर्म टिकला तर देश टिकेल, या विचारापेक्षा, माणूस टिकला तरच देश आणि धर्म टिकेल, असा विचार करून या निवडणुकीत आपल्याला अतिशय सावधपणे, सूज्ञपणे व आपल्या सद्सद्विवेकबुद्धीला स्मरून विचारपूर्वक मतदान करावे लागणार आहे. 'बहुजन विकास आघाडी'ने आत्तापर्यंत केवळ सामान्यजनांचे जीवन सुखद आणि समृद्ध कसे होईल याचाच विचार केला आहे. आणि म्हणूनच **परंपरा लोकशाहीची-सर्वांगीण विकासाची** हा नारा देत निवडणूक लढवत आहोत. 'बहुजन विकास आघाडी'ने वसई, नालासोपारा, बोईसर मतदारसंघांत किंबहूना पालघर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर विकासकामे केली आहेत. नागरी सुविधांबरोबरच सांस्कृतिक, कला-क्रीडा, शिक्षण, आरोग्य, पर्यटन इत्यादी क्षेत्रातही भरीव असे काम केले आहे व यापुढेही हे कार्य असेच अविरत सुरूच राहणार आहे. त्यामुळे विरोधकांकडे विरोध करण्यासाठी देखील आता कुठलेही विषय उरलेले नाहीत.

जागतिक तापमानात अनियंत्रित वाढ होत असल्यामुळे अव्याहतपणे सुरु असलेले निसर्ग चक्र बिघडत चालले आहे. शहरे तापमान वाढीची केंद्रे बनून त्या परिसरांत कमी दाबाचा पट्टा तयार करून अतिवृष्टीला आमंत्रण देत आहेत. प्रतिवर्षी होणारी अतिवृष्टी व पूरसदृश परिस्थिती हे तापमानवाढीचेच फलीत आहे, यावर आता जागतिक स्तरावर शिक्कामोर्तब झाले आहे.

शासकीय धोरणे, एमएमआरडीए आणि सिडको यांच्याकडून शहर नियोजनाचा उडालेला बोजवारा याचा फटका संपूर्ण मुंबई महानगर प्रदेशाला बसला असून संपूर्ण महानगरात प्रतिवर्षी पूरपरिस्थिती निर्माण होऊ लागली आहे. तरीदेखील हे वास्तव नाकारत नैसर्गिक आपत्ती व मानवी क्षमतेपलिकडच्या विषयांवर बोलून ते आता जनतेची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यामुळे विरोधकांच्या कुटील नितीला शह देण्याची जबाबदारी आता मतदार म्हणून आपल्याला पार पाडावी लागणार आहे.

कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी खबरदारीचा उपाय म्हणून राज्य शासनाच्या शिफारशीवरून महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाने राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुढे ढकलल्या. यातच ओबीसी आरक्षण, सदस्यसंख्या वाढ आणि प्रभाग रचना ही प्रकरणे सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असल्याने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका अनिश्चित काळापर्यंत पुढे ढकलल्या गेल्या आहेत. याचा परिणाम म्हणजे गेली चार ते साडेचार वर्षे महानगरपालिकेमध्ये प्रशासकीय राजवट असून कोणीही लोकनियुक्त नगरसेवक नाही.


राज्यातील नगरपालिका, महानगरपालिका, पंचायत समित्या, जिल्हा परिषदा या स्थानिक स्वराज्य संस्थांवर प्रशासकीय राजवट असल्यामुळे राज्याच्या सर्वांगीण विकासाला मोठी खीळ बसल्याचं चित्र आहे. अशी वेळ यापूर्वी कधीही निर्माण झाली नव्हती. प्रशासकीय राजवटीमुळे या संस्थांमध्ये मोठ्या प्रमाणात एकाधिकारशाही तसंच मनमानी कारभार वाढला असून सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. माझी आपणास पुनःश्च एकदा विनंती आहे, की या सर्व समस्यांवर प्रभावी उपाययोजना करण्यासाठी आणि शासनाकडून मंजूर करून घेण्यात आलेली सर्व कामे विनाविलंब पूर्ण करून घेण्यासाठी आपण **बुधवार, दिनांक २० नोव्हेंबर २०२४ रोजी** होणाऱ्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत 'बहुजन विकास आघाडी'च्या तीन्ही उमेदवारांना **शिटी** निशाणीवरील बटण दाबून प्रचंड बहुमतांनी निवडून द्या.

आपला,
**हितेंद्र विष्णू ठाकुर**
अध्यक्ष - बहुजन विकास आघाडी

**आपली निशाणी**
**शिट्टी**

| हितेंद्र विष्णू ठाकुर | क्षितिज हितेंद्र ठाकुर | राजेश रघुनाथ पाटील |
|---|---|---|
| १३३ - वसई मतदारसंघ | १३२ - नालासोपारा, मतदारसंघ | १३१ - बोईसर (अ.ज.) मतदारसंघ |

# पाणी योजना



**१९९० साली - ६० लाख लिटर पाणी पुरवठा**

आजमितीस - ४३० दशलक्ष लिटर (४३ करोड लिटर) पाणी वितरण, नजीकच्या काळासाठी देहरजे - २६० दशलक्ष लिटर (२६ करोड लिटर), खोलसापाडा १ आणि २ - ७५ एमएलडी - (७.५ करोड लिटर), सुसरी १८० दशलक्ष लिटर (१८ करोड लिटर)

एकूण - प्रतिदिन ५१५ दशलक्ष लिटर (५१.५० करोड लिटर) पाणी उपलब्ध होणार.

* अमृत - २ अंतर्गत महानगरपालिका क्षेत्रांत १० नवीन उच्च जलकुंभांमार्फत ७२५ कि.मी. वितरण व्यवस्था. अंदाजे ५०० कोटी रुपयांचे काम सुरू.
* व्हॉल्वमनमुळे निर्माण होणाऱ्या त्रासातून मुक्त होण्यासाठी अध्ययावत स्वयंचलित राबविण्यात येईल.

# रेल्वे / मेट्रो



* एसी ट्रेनच्या फेऱ्या डहाणूपर्यंत.
* दोन स्टेशनमधील अंतर कमी करण्यासाठी प्रयत्न करणे.
* सततच्या पाठपुराव्यामुळे भाईंदर खाडीपुलावरुन विरारपर्यंत मेट्रो चालविण्यास परवानगी. पालघरपर्यंत नेण्यासाठी प्रयत्न सुरु.
* विरार-वसईला मुंबईशी जोडण्याकरीता मेट्रो -१३ प्रकल्पाचे काम सुरु.

**खाडी पूल व रेल्वे ओव्हरब्रीज :**

* भाईंदर-नायगांव नवीन खाडीपूल मेट्रोसहीत मंजूर.
* वैतरणा नदीवरील बहाडोली खाडीपूल निविदा प्रसिद्ध.
* वसई ते सफाळे नारिंगी खाडीवर पूल बांधणे निविदा प्रसिद्ध.

**महापालिका क्षेत्रात ४ नवीन रेल्वे ओव्हरब्रीज :**

* विरार-विराटनगर
* नालासोपारा-ओसवालनगरी
* नालासोपारा-अलकापूरी
* वसई-उमेळमान
* रेल्वे प्रशासनाकडून सर्वेक्षण पूर्ण





# उड्डाणपुल व रस्ते : ७ नवीन उड्डाणपुले होणार

**१८२५ कोटीची कामे मंजूर.**
**७ नवीन उड्डाणपुले होणार.**


* रेंज ऑफिस, गोखिवरे वसई (पू.).
* चंदननाका जंक्शन ते नालासोपारा (पू.).
* बोळींज ओलांडा नाका ते सायन्स गार्डन, विरार (प.)
* मनवेलपाडा नाका ते फूलपाडा जंक्शन, विरार (पू.).
* माणिकपूर ते बाभोळनाका, वसई (प.).
* वसंत नगरी ते एव्हरशाईन, गोखिवरे, वसई रोड (पू.).
* नारिंगी (साईनाथ नगर).

### रस्त्यांचे रुंदीकरण व काँक्रिटीकरण.

* अहमदाबाद महामार्गावरून वसई, निर्मळ, अर्नाळा व औद्योगिक क्षेत्रांना जोडणाऱ्या ७ रस्त्यांचे रुंदीकरण व काँक्रिटीकरण.
* चिंचोटी-कामण-भिवंडी रस्त्याचे रुंदीकरण व काँक्रिटीकरण काम मंजूर.
* शिरसाड-अंबाडी-वाशींद रस्त्याचे रुंदीकरण व काँक्रिटीकरण करण्याचा प्रस्ताव.
* मनोर-वाडा-आसनगांव महामार्ग समृद्धी महामार्गास जोडण्याच्या कामाची निविदा प्रसिद्ध.
* आदिवासी पाड्यांमध्ये डांबरी रस्त्यांचे काँक्रिटीकरण.
* विरार-अलिबाग कॉरिडोर मेट्रो रेल्वेसह होणार.

### रिंगरूट रस्ता :

रु. २६०० कोटी रुपये खर्चाच्या वसई तालुक्यातील ४ प्रमुख शहरांना व सभोवतालच्या गावांना जोडणाऱ्या महानगरपालिका हद्दीतील ३६ कि.मी. लांबीच्या रिंगरूटच्या मेट्रोसहीत कामाची कार्यवाही सुरू.




### सागरी महामार्ग :

मुंबई वर्सोवा ते पालघर या ३० हजार कोटी रुपये खर्चाच्या सागरी महामार्गाची मागणी मंजूर.

# कृषी महाविद्यालय आणि कृषी विकास

* स्थानिक युवकांना आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख होण्याच्या दृष्टीने पालघरमध्ये कृषी, मत्स्य आणि कृषीअभियांत्रिकी शाखेसह कृषी महाविद्यालय स्थापन करणे.
* पालघर, जव्हार, विरार, वसई, नालासोपारा यासारख्या शहरांमध्ये शेतकरी बाजार निर्माण करणे.
* पालघर, जव्हार, मोखाडा, विक्रमगड येथे कृषी संशोधन केंद्र सुरू करणे.
* फळ पिकांच्या परिक्षणासाठी स्वतंत्र संशोधन केंद्राची स्थापना.
* पालघर जिल्ह्यातील अधिकाधिक जमीन सिंचनाखाली आणण्यासाठी विशेष प्रयत्न.

## मलनि:सारण केंद्र / भुयारी गटार योजना



- वसई-विरार मनपा क्षेत्रांतील ७ मलनि:सारण केंद्र.
- भुयारी गटार योजनापैकी १ काम पूर्ण.
  उर्वरीत प्रकल्प प्रगतीपथावर.

## जल वहातूक - रोरो सेवा



- वसई-भाईंदर फेरीबोट सेवेच्या संख्येत वाढ करणे.
- विरार-नारिंगी ते खारवाडेश्वरी (टेंभी-खोडावे-सफाळा) फेरीबोट सेवा २ महिन्यात सुरू होणार.
- ठाणे-कल्याणपर्यंत लवकरच विस्तार.

## तलाव विकास



शहरांतील सर्व तलावांचे सुशोभिकरण करून विकास करण्यात येईल.

## क्रीडा / सांस्कृतिक



- विरार येथील अत्याधुनिक क्रीडा संकुलाचे काम प्रगतीपथावर असून तेथे क्रीडाविषयक पायाभूत सुविधांची निर्मिती.
- राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडविण्यासाठी त्यांना अत्याधुनिक प्रशिक्षणासाठी सुविधा, आर्थिक सहाय्य, प्रोत्साहन, सवलती, त्यांचा गौरव करून त्यांचे मनोबल उंचावणे, क्रीडाविषयक वातावरण निर्माण करण्यासाठी क्रीडा महोत्सवांचे आयोजन, तांत्रिक मनुष्यबळ विकास, क्रीडा विद्यापीठाची स्थापना, क्रीडाविषयक संस्थांना प्रोत्साहन, साहसी क्रीडा प्रकारांना उत्तेजन, क्रीडाधोरण अमलबजावणीसाठी उच्चस्तरीय समितीची स्थापना.
- गेली ३५ वर्षे वसई तालुक्यात कला-क्रीडा महोत्सवाचे आयोजन.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन २२० कोटी

# वीज



- ✻ २०१९ साली ५४० मेगावॅट वीज पुरवठा.
- ✻ २०२४ अखेर ६९० मेगावॅट वीज उपलब्ध.
- ✻ २२० के.व्ही.चे अतिउच्चदाब केंद्र चिखलडोंगरी-विरार, कोपरी-विरार (पू.), सुरक्षा सिटी, गोखिवरे.
- ✻ कामण येथील १०० के.व्ही. अतिउच्चदाब केंद्राची २०० के.व्ही. क्षमता वाढ मंजूर. काम सुरू असून ६०० मेगावॅट वीज पुरवठा उपलब्ध होईल.
- ✻ महावितरणाची वितरण प्रणाली अद्ययावत करण्यासाठी १८०० कोटी मंजूर.
- ✻ भूमिगत वीज वाहिन्याकरिता १८५ कोटी मंजूर.

# पर्यटन



- ✻ पालघर जिल्ह्याला पर्यटन जिल्ह्याचा दर्जा मिळावा यासाठी शासनाकडे पाठपुरावा सुरु.
- ✻ कृषी पर्यटन, जंगल पर्यटन, सागरी पर्यटन, साहसी पर्यटन, पॅरासेलिंग, पॅराग्लायडिंग, बोटींग, वॉटर स्पोटर्स अशा अनेक सुविधा निर्माण करणार.
- ✻ पर्यटनातून रोजगाराच्या सुविधा निर्माण होतील.

# आरोग्य

- ✻ ९ रुग्णालये -७३५ बेड, प्राथमिक आरोग्य केंद्रे -२१, आयुष्यमान आरोग्य केंद्रे - २६, आपला दवाखाना - १५ आरोग्याकरिता - वार्षिक १२० कोटी अंदाजित खर्च
- ✻ अंदाजित ४०४ कोटी खर्चाचे - आचोळे येथे ४०० खाटांचे मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल काम मंजूर.
- ✻ कान, नाक, घसा (ENT) आणि डोळे वरील अद्यायावत यंत्राद्वारे कौलसिटी येथील रुग्णालयात मोफत शस्त्रक्रिया.
- ✻ मोफत डायलिसिस सेंटर व शहरातील प्रत्येक रुग्णालयात प्रतिरुग्ण प्रती डायलिसिसकरीता अनुदान.
- ✻ कौलसिटी येथे राखीव भूखंडात ३०० बेडचे सुपरस्पेशालिटी रुग्णालय प्रस्तावित.
- ✻ कौल हॉस्पिटल वसई येथे १२ खाटांचे डायलिसिस सेंटर. दररोज ३५ रुग्णांना लाभ. आतापर्यंत ७ हजार रुग्णांनी याचा लाभ घेतला आहे.



## महिला व बाल कल्याण



वसई-विरार महानगरपालिका क्षेत्रांतील समाजातील विविध घटकांसाठी सर्वाधिक कल्याणकारी योजना राबवणारी महानगरपालिका असून अंध, अपंग व अन्य शारीरिक व्याधीग्रस्त, अनाथ, निराश्रित, विधवा, निराधार, परितक्त्या, घटस्फोटीत महिला, ज्येष्ठ नागरीक, विद्यार्थी, विद्यार्थीनी, मागासवर्गीय, दारिद्र्यरेषेखालील, आर्थिकदृष्ट्या दुर्बल यासारख्या समाजातील विविध घटकांसाठी महापालिका राबवत असलेल्या योजनांचे अनुकरण आज शासन अन्य महानगरपालिकांमधून करण्यात येते.

## मच्छीमार



- किनाऱ्यावरील कोळीवाडे मच्छिमार वसाहतींनी व्यापलेल्या शासकिय जागांची मालकी मच्छिमारांच्या नावे करण्यासाठी प्रयत्न.
- घाऊक बाजारांमध्ये शीतगृह व प्रक्रिया केंद्राची सुविधा देणार.
- एकूण सागरी किनाऱ्यालगत धूपप्रतिबंधक बंधाऱ्यांची दुरुस्ती करणे.

## आदिवासी विकास



✻ तसेच तलासरीमध्ये आदिवासी उपयोजनेतली फ्लोरिक्लचर आणि ॲग्रीक्लचर यावर संशोधन केंद्र सुरु करणार. ✻ आदिवासी विभागामध्ये मेडिकल कॉलेज, सुसज्ज रुग्णालय, इंजिनिअरिंग कॉलेज, ॲग्रीक्लचर कॉलेज निर्माण करणे. ✻ आदिवासी संस्कृतीचे जतन व संवर्धन करणार.

## रोजगार निर्मिती



- महिला लघु उद्योग आणि गृहउद्योगांना, ग्रामोद्योग आणि कुटीर उद्योगांना प्रशिक्षण आणि अर्थसहाय.
- आय टी पार्क, बिझनेस हब निर्माण करणे.
- कृषीमाल प्रक्रिया केंद्र निर्माण करणे. ★ पालघर जिल्ह्यातील आदिवासींसाठी शेती, रानभाज्यांची लागवड, वनौषधींची लागवड, वारली चित्रकला, हस्तकला, काष्ठशिल्पकला यांना प्रोत्साहन देणे.
- डायमेकिंगसारख्या पारंपारिक लघु उद्योगांना प्रोत्साहन देणे.

## पारिवारीक योगदान



वि.वा. महाविद्यालयातून मेडिकल व पॅरामेडिकल वगळता विविध कोर्सेसमधून सुमारे ३५००० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. लवकरच मेडिकल व पॅरामेडिकल कोर्स सुरू करणार. जगातील सर्वात मोठे ज्युनिअर कॉलेज आहे. वसईत इतर ९ ठिकाणी आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शाळा सुरू करणार.
जुने विवा कॉलेजमधील रंगमंच व सभागृह विविध सामाजिक संस्थांकरिता विनामूल्य सुरू आहे.

## संस्था सहकार्य

संजीवनी रुग्णालय यांच्या सहकार्याने आणि जीवदानी देवी मंदिर ट्रस्ट, ॐ साईधाम मंदिर ट्रस्ट, यंगस्टार्स ट्रस्ट, वि.वा. ठाकूर चॅरिटेबल ट्रस्ट, स्वर्गीय तारामती हरिश्चंद्र ठाकूर ट्रस्ट, मंगलमूर्ती मंदिर ट्रस्ट, स्वयंभू महादेव मंदिर ट्रस्ट, वाय.के. पाटील चॅरिटेबल ट्रस्ट, तुळींज एज्युकेशन ट्रस्ट यासारख्या विविध संस्थांच्या सहायाने तालुक्यात अनेक डायलेसिस सेंटर सुरू करण्यात आली असून अतिशय माफक शुल्क आकारून ही सेवा पुरविण्यात येत आहे.

## कोरोना महामारीच्या काळातील सेवा कार्य

**माझ्या तालुक्यात कोणीही उपाशी झोपणार नाही**

- ✻ गरजूंना रोज दोन वेळ भोजन व्यवस्था करण्यात येत होते. हे संकट जोपर्यंत होते तोपर्यंत हा उपक्रम सुरू होता. संपूर्ण कोरोना काळात सव्वाकोटी लोकांची नि:शुल्क भोजन व्यवस्था करण्यात आली.
- ✻ विनामूल्य कॉरंटाईन सेंटर - विवा कॉलेज संकुलात
- ✻ मोफत जीवनावश्यक वस्तुंचे वाटप ✻ रेमडीसिवरसारखी इंजेक्शन देण्यात आली.
- ✻ रक्तदान शिबीर व कोरोना प्रतिबंधक लस माफक/नि:शुल्क देण्यात आली.

## पाठपुरावा

- ✻ वसई तालुक्यातील १५०० एकर शासकीय जमीन लोकोपयोगी कामांसाठी मनपाकडे हस्तांतरीत करण्याचा प्रस्ताव.

परंपरा लोकशाहीची
सर्वांगीण विकासाची

# बहुजन विकास आघाडी

**आपली निशाणी शिट्टी**

प्रकाशक : अजीव पाटील, गावठाण, विरार (प.), प्रिंटर : पॉप्युलर ऑफसेट प्रिंटर, लोअर परेल, मुंबई - ४०० ०१३ - तारीख : ११-११-२४ कृपया हे पत्रक भिंतीवर चिकटवू नये. प्रती - २५,०००

**मतदान : बुधवार दि. २० नोव्हेंबर २०२४**
**वेळ : सकाळी ७.०० ते सायं. ६.००**